१०

# संत गुलाबराव महाराज

९३९०



म. ग्रं. सं. वाचनालय, ठाणे
विषय बा. वा.
दा.क्र. ९३९०

BVBK-0401317

वाच. आ. वा.
१३९७
५१८

पुष्प १०

समन्वयमहर्षी

# संत गुलाबराव महाराज

लेखिका

सौ. सुनीति आफळे

श्रीगुलाबराव महाराज जन्मशताब्दी प्रकाशन

BVBK-0401317

भारत-भारती (मराठी संस्करण)
रुईकर पथ, महाल, नागपूर-२

प्रकाशक

भारत-भारती (मराठी संस्करण) बाल पुस्तकमाला

प्रभाकर फैजपूरकर

मंत्री

श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती

रुईकर पथ, नागपूर, महाराष्ट्र

संपादक–मराठी संस्करण

सुरेश दत्तात्रेय देशपांडे

प्रथम संस्करण जानेवारी १९८१

किमत रु. २–००

मुद्रक

चंद्रकांत तापस

श्री प्रसाद मुद्रण, ८, वर्धा मार्ग, नागपूर–१२

# थोडे उपक्रमाविषयी

आपल्या पूर्वजांचे स्मरण म्हणजे कर्तृत्वाच्या प्रेरणेचा अखंड स्त्रोत. त्यांच्या जीवनाच्या अभ्यासातून आपल्याला नेहमीच बोध आणि मार्गदर्शन मिळत आलेले आहे. केवळ भारतीयांनाच नव्हे, तर जगातील साऱ्या मानवांना, आपले हे सांस्कृतिक धन म्हणजे एक कुतूहलाचा विषय आहे.

आपला गौरवशाली इतिहास ज्यांनी निर्माण केला, त्या महान व्यक्तींची जीवनचरित्रे सरळ, सोप्या आणि सहज पद्धतीने सादर करण्याचे कार्य बंगलोरच्या 'राष्ट्रोत्थान परिषदे'ने सुरू केले. कन्नड आणि इंग्रजी भाषांमधून लिहिलेल्या छोटया–छोटया पुस्तकांच्या रूपाने हा इतिहास नव्या पिढीपर्यंत पोचविण्याचे हे कार्य आहे. प्रस्तुत पुस्तकाचा अपवाद सोडल्यास मुळात ही चरित्रे कन्नड भाषेमध्ये लिहिलेली आहेत. विदर्भातील संतश्रेष्ठ प्रज्ञाचक्षू श्रीगुलाबराव महाराज यांच्या जन्मशताब्दी निमित्त हे पुस्तक प्रथम मराठीत व नंतर इतर भाषात प्रसिद्ध व्हावयाचे आहे.

नागपूरच्या 'श्री. बाबासाहेब आपटे स्मारक समिती' ने या समग्र चरित्रांचे मराठी अनुवाद प्रकाशित करण्याची जबाबदारी स्वीकारलेली असून 'भारत-भारती' (मराठी संस्करण) या उपक्रमाच्या अंतर्गत हे प्रकाशनकार्य चालू आहे.

आपले ऐतिहासिक महापुरुष, ऋषी-मुनी, सम्राट, वीर, योद्धे, साधुसंत, राजनीतिज्ञ, कलावंत इत्यादी साऱ्यांचा समावेश या पुस्तकमालेत आहे.

आपला हा अक्षय ठेवा उमलत्या पिढीच्या स्वाधीन करीत असता त्या कार्यात आपल्यालाही काही वाटा उचलता आला, याबद्दल आम्हाला आनंद वाटतो. आपल्यालाही हा उपक्रम आवडेल आणि आपले सहकार्य या उपक्रमास लाभेल, असा विश्वास आहे.

विनीत

**सुरेश दत्तात्रेय देशपांडे**

सम्पादक

शाखा.
क्र. १३९७० दि. ६।१।८२
विषय

# समन्वयमहर्षी श्रीगुलाबराव महाराज

'तुझ्या पाठीमागे कोण उभं आहे ते सांग वरं...'

'ही तर आपल्या मोहोडांची यमुना !...'

'अन् तिच्यामागे कोण उभी आहे ?...'

'ती देशमुखांची जनी !....'

विहीरीवर पाणी भरायला आलेली एक खेडूत स्त्री तिथे उभ्या असलेल्या एका अंध बालकाला हे प्रश्न विचारीत होती. अन् ५ वर्षाचा तो आंधळा मुलगा त्याच्यामागे उभ्या असणाऱ्या बायकांची नावे धडाधड सांगत होता.

'तुला दिसत नाही,तरी नावे कशी रे सांगतोस बरोबर ?...' त्या बाईने कौतुकाने विचारले. तसा अगदी सहज सुरात तो छोटा मुलगा म्हणाला –

'त्यात काय ! जोडव्यांच्या अन् बांगड्यांच्या नादावरून !'

'पण जोडवी अन् बांगड्या तर सगळ्यांनीच घातल्या आहेत ! त्यावरून तुला नावं कशी रे, ओळखता

आली ?' आश्चर्याने त्या बाईने परत विचारले.

'प्रत्येकीच्या बांगडीचा नाद वेगळा येतो. जोड-ब्यांचा आवाजहि वेगळा असतो. त्यामुळे मला लगेच कळते, माझ्यामागे कोण उभीय् ते !'

त्या आंधळ्या मुलाचे नाव होते गुलाब. सारीजणं त्याला लाडाने गुल्ल्या म्हणून हाक मारीत. दुर्दैवाने बालपणी ८ व्या महिन्यातच त्याचे दोन्ही डोळे गेले व तो पूर्णत: आंधळा झाला. परंतु देवाने जणूं त्याला एक वेगळीच नजर दिली होती. डोळे असलेल्यांना जे दिसत नाही ते त्याला दिसे; डोळे असलेल्यांना जे कळत नाही ते त्याला कळे आणि थोरामोठ्यांना जे समजणार नाही ते या पाच वर्षाच्या बालकाला समजे. याचे कारण होते त्याच्या ठिकाणी असलेला ईश्वरी अंश ! एक लोकोत्तर जीवन घेऊनच हे बालक जन्माला आले होते. जन्माला यावे—खावेप्यावे—मौजमजा करावी अन् म्हातारपणी कण्हत कुंथत मरून जावे, असे सर्व-सामान्यांचे जिणे जगायला तो या जगात आला नव्हता. या समाजात या जगात काही विशेष असे कार्य करून दाखविण्यासाठीच जणूं एक महात्मा बालरूपात वावरत होता.

त्यांचे संपूर्ण नांव होते–गुलाब गोंदुजी मोहोड !

## जन्म व बालपण

मोहोड घराणे माधानचे. वऱ्हाडात उमरावतीच्या उत्तरेस २३ मैलावर माधान नावाचे एक खेडे आहे. तेथे मोहोड घराण्यात राणोजीराव नावाचे एक सत्पुरुष होऊन गेले. हे सुरुवातीपासूनच शंकर आणि विष्णूची मनोभावे सेवा करणारे होते. देव ब्राह्मणांच्या पूजेत त्यांना मोठे समाधान वाटे. दानधर्म–व्रतवैकल्य यात त्यांचा काळ जाई. मोठेपणी ईश्वराने त्यांना असा दृष्टांत दिला की तुझ्या कुळात एक महात्मा पुरुष जन्म घेणार आहे.

राणोजीरावांना चार पुत्र. रघुजी, बकारामजी, नरसाभाऊ व गोंदुजी!

त्यापैकी पहिल्या तिघांना संतती नव्हती. धाकटा गोंदुजी हा मोठा शिवभक्त, दानी व उपासक. त्याची पत्नी अलोकाबाई. हिला ६ जुलै १८८१ मधे मुलगा झाला. तोच हा दिव्यज्ञानी बालक–गुलाब होय !

आपल्या अंगच्या अलौकिक गुणांमुळे हाच मुलगा पुढे महात्मापदी चढला व गुलाबराव महाराज म्हणून

त्याची ख्याती सर्वत्र पसरली.

महाराजांचा जन्म त्यांच्या आईच्या माहेरी, म्हणजे उमरावतीपासून १३ मैलावर असलेल्या लोणी टाकळी येथे झाला होता. जन्मतः त्यांचे डोळे मोठे पाणीदार होते. सावळा रंग, सरळ नाक, बाळसेदार रूप—त्यामुळे ते फारच मोहक दिसत. पुढे आठव्या नवव्या महिन्यातच त्यांचे डोळे आले व त्यात भलतेच औषध चुकीने टाकले गेले. त्यामुळे त्यांचे दोन्ही डोळे आंधळे झाले. बाह्यदृष्टी नाहीशी झाली तरी दिव्यदृष्टि असल्यामुळे की काय ते नेहमीच आनंदी असत.

ते चार वर्षांचे असताना त्यांना एक बहिण झाली पण ती वाचू शकली नाही. त्यातच आईला बाळंतरोगाने पछाडले आणि त्यांची आई पण त्यांना लहानपणीच सोडून गेली. त्यांच्या आजीने (आईच्या आईने) त्यांना लोणीस आणले आणि मोठ्या प्रेमाने त्यांचा सांभाळ केला. आजीचे नाव सावित्री होते. पण महाराज तिला बाई म्हणत. बाईचा त्यांना विशेष लळा होता. तिच्याजवळच ते भातके मागत. भूक तहान तिलाच सांगत. तिच्याजवळ तऱ्हेतऱ्हेचे हट्ट करावे व ते पुरवून घ्यावे. बाईहि मोठ्या कौतुकाने त्यांचे हट्ट पुरवी. लाडक्या

गुल्ल्याशिवाय तिलाही चैन पडत नसे. त्यांचे सारे लाड ती प्रेमाने पुरे करी.

गुल्ल्या आंधळा. बाहेर अंगणात विहीर. महाराज अंगणात सतत धावपळ करीत, तेव्हां ते विहिरीत पडतील की काय याची तिला सतत काळजी वाटे. ते धावत पळत घरातून बाहेर आले की ती ओरडे– 'डोयाले दिसत नाही, पडशील ना रे–' पण जणूं डोळे असल्यागतच महाराज विहिरीच्या अवतीभवती वावरत.

रोज जेवायला बसले की महाराज चंदनाचे गंध घेऊन बोटाने इकडे तिकडे शिंपडीत. जेवण करीत असतांना मधेच दोन्ही हात पुढे करीत. बाई विचारी– 'हे रे काय चालले आहेत तुझे चाळे?'

त्यावर महाराज उत्तर देत, 'अग बाई, एक सुंदर लेकरू आलं होतं'

'कुठलं रे लेकरू? कसं होतं?' बाई आश्चर्यानं विचारी; कारण तिला तर कुणीच दिसत नसे.

महाराज म्हणत–'अगं त्याच्या डोक्यावर मुकुट होता. कपाळाला केशरी गंध–कानात कुंडलं होती.....'

अन् जणू काही डोळ्यापुढं भगवंताची बालमूर्ती उभीच आहे असे ते वर्णन करीत–

तूं जेंवि रे, सगुणा यशोदा बाळा ।।ध्रु.।।
आधी माझा घेई ग्रास ।
स्वामी गोपिकानिवास ।। त्रिभुवनपाळा ।।

## किशोरावस्था व शिक्षण

पुढे दहावे वर्ष लागले असता महाराजांना आजोळहून परत माधानला,वडिलांच्या घरी आणण्यात आले. त्यांच्या वडिलांनी दुसरे लग्न केले होते. सावत्र आई छोटया गुलाबचा तिरस्कार करीत असे. आंधळे पोर म्हणून घरात त्यांची सर्वत्र हेळसांड होई. अशा परिस्थितीत त्यांना मायेची पाखर घालणारी त्या घरात एकच व्यक्ती होती व ती म्हणजे त्यांची वडील चुलती–बकारामजींची पत्नी. तिने महाराजांवर प्रेमाची सावली धरली. त्यांचे तिने खूप लाड केले व आत्मीयतेने संगोपन केले. महाराज या वडील काकीला ताई म्हणून हाक मारीत. ताईला स्वत:ला मूलबाळ नसल्यामुळे छोटया गुलाबला तिने फार जीव लावला. खाणे, पिणे, निजणे सर्वकाही ताईवाचून होत नसे. इतकेच काय, जेवणाच्या वेळी

छोटया गुलावने अडून बसावे व मग मोठया कौतुकाने ताईने त्याला घास भरवावे असे बरेचदा घडे. महाराज झोपतांना देखील मायेने, ताई गाणी म्हणीत असे–

‘ तान्हया गं, लेकराची माय गेली पाण्या
साखरा देजो वाण्या माझ्या गुलावराया ।। ’

इत्यादि ताईच्या तोंडची गाणी पुढे गुलावराव महाराजांना वारंवार आठवत. ताईवर त्यांचा इतका विश्वास की कुणी काही खाऊ दिला तर प्रथम तो त्यांनी ताईला दाखवावा व मग तिने खा म्हटले तरच खावा.

सावत्र आई तर कसेहि करून चिमण्या गुलावला दृष्टिआड करावयास टपलेली होतीच. चांदुरवाजार येथे रूपचंदजी नावाचा एक गुजराथी ब्राह्मण रहात होता. तो ज्योतिष वगैरे सांगत असे. सावत्र आईने त्याला म्हटले की तुम्ही आमच्या घरी सांगा, की हा मुलगा मूळनक्षत्रावर जन्माला आला आहे, तेव्हां याला घरात ठेऊ नका. याला महानुभावांना देऊन टाका. परंतु रूपचंदजी हा भला माणूस होता. त्याने असले भलते सलते व खोटे नाटे सांगण्याचे साफ नाकारले. त्याच्या या सरळ स्वभावामुळे पुढे महाराजांचा व



तूं जेवीरे सगुणा यशोदा बाळा ॥

त्याचा खूप जवळचा आणि आपलेपणाचा संबंध जडला.

हा डाव फसल्यावर पुढे सावत्र आईने महाराजांना एक राजगिऱ्याचा लाडू खायला दिला. तो त्यांनी नेहमीप्रमाणे सवयीने ताईला दाखवला. ताई म्हणाली 'इतक्यात खाऊ नकोस. स्नान करून शंकराचे दर्शन घे व मग खा.' पण मग नंतर स्वत: महाराजांनाच संशय आला व त्यांनी तो लाडू खाल्ला नाही. अशा-प्रकारे एक संकट टळले. जणू अंतरातील ईश्वरानेच त्यांना सावध केले !

अशाप्रकारे गृहकलह आणि सावत्र आईचा जाच या दोन्ही गोष्टी बालवयातच त्यांना अनुभवायला मिळाल्या. असे असूनही त्यांचे मन सदा प्रसन्न असे. या बाह्य जगातले हेवेदावे या लोकोत्तर पुरुषाच्या उदार अन् विशाल मनाला जणू स्पर्शतच नव्हते. लहान-पणापासूनच जन्मदात्या आईचे सुख नाही—वडिलांची प्रेमळ माया नाही, पण अखिल जगताचा जो मातापिता—ईश्वर त्याची मात्र कृपा मुक्त हस्ताने या चिमण्या जिवावर उधळली गेली होती. ईश्वरसेवेची त्यांना उपजतच ओढ होती. दगडावर दगड रचून कैलास करावयाचा व त्यावर महादेवाची स्थापना करून

छोटा गुलाब त्याची तासन् तास पूजा करायचा.

या किशोरावस्थेतच महाराज समाधी पण लावू लागले होते. खोली बंद करून ते समाधी लावून बसत. समाधी–अवस्थेत श्वासोच्छ्‌वास थांवतो. श्वास बंद झाला म्हणून कित्येकदा घरची माणसे घाबरून जात. पुढे समाधी उतरली की श्वासोच्छ्‌वास परत पूर्ववत् सुरू होई.

महाराजांचे वडील चुलते रघुजीराव हे सर्व बघून त्यांना मारपीट करू लागले. कारण त्यांना हे सर्व ढोंग वाटत असे. कित्येकदा त्यांनी महाराजांना खूप धाकदपटशा दाखवून शाळेत नेऊन बसवले. पण शाळेत महाराजांचे मन रमत नसे. तिथे ते इतरांच्या खोड्या काढीत. त्याबद्दल पुष्कळदा मास्तरांचा त्यांनी मारहि खाल्ला.

कधीकधी रघुजीराव, महाराजांना हात धरून शाळेत नेत व मास्तरांना म्हणत–" याला काही हिशेब, पाढे तरी शिकवा."

पण मास्तरांनी काही सांगितले की लगेच त्याने तोंडपाठ म्हणून दाखवून मोकळे व्हावे !

मास्तरांनी शब्दरूपावली सांगितली की ती यांची

लगेच पाठ !

लघुव्याकरण मास्तर सांगू लागले तर त्यातले नियमहि यांचे लगेच ऐकताक्षणी पाठ !

अशाप्रकारे दृष्टि आंधळी असली तरी बुद्धीला विलक्षण धार अन् चमक. त्यामुळे इतर सर्वसामान्य डोळस मुलांहूनही महाराज बुद्धिमान अन् हुशार ठरले. लहानपणापासूनच ते एकपाठी होते. कुठे काही ऐकले की ते ज्ञान जणू त्यांच्या बुद्धीवर कोरले जाई.

शास्त्रपुराणांवर त्यांची फार प्रीती होती. कुणी पुराणातली एखादी गोष्ट सांगितली की ती त्यांची लगेच तोंडपाठ होई. कुणी श्लोक म्हटला की महाराज तो लगेच जस्साच्या तस्सा म्हणून दाखवीत.

या बालवयातच त्यांनी शिवलीलामृताचा अकरावा अध्याय, व्यंकटेश स्तोत्र, मंगलाष्टके वगैरे पाठ केली. स्वत:ला वाचता येणे शक्यच नव्हते. पण दिवसेंदिवस ग्रंथांमधील ज्ञान समजून घेण्याची इच्छा वाढतच गेली. जवळपास वावरणाऱ्यांकडून महाराज होतील तेवढे ग्रंथ वाचून घेत. एकदा तो ग्रंथ ऐकला की झाला पाठ.

ग्रंथ वाचून घेण्यासाठी काळ, वेळ, श्रम व पैसा

यांची कशाचीच त्यांनी पर्वा केली नाही. वडील चुलते रागावतील म्हणून त्यांच्या नकळतच ते ताईकडून ज्वारी किंवा गहू वगैरे धान्य मागून घेत. व तीच गुरुदक्षिणा देऊन कुणाकडूनही पुस्तके वाचून घेत. एकदा तर त्यांनी एक पुस्तक ऐकण्यासाठी हातातले चांदीचे कडेहि देऊन टाकले. अशाप्रकारे ग्रंथज्ञानाची एक दुर्दम्य अशी तहान या किशोरावस्थेतच त्यांना लागली होती. ती शमवण्यास ते नानाप्रकारची मेहनत अन् खर्च करीत.

हा मुलगा मोठा कुशाग्र बुद्धीचा आहे; याला वाचून दाखवले की लगेच हा पाठ म्हणून दाखवतो; याचे बौद्धिक तेज काही वेगळेच आहे, हे जसजसे लोकांच्या लक्षात येऊ लागले तसतसे लोकही त्याला मोठ्या प्रेमाने मोठमोठाले ग्रंथ वाचून दाखवू लागले!

कुणाकडून थोडेसेही काही शिकले तरी त्याला गुरू म्हणून मोठेपणा देऊन ते त्याचा आदर करीत. महादेवाच्या देवळातल्या लक्ष्मण भटजीकडून त्यांनी महिम्न, काशीखंड वगैरे शिकून घेतले. लोकांकडे एकेक पैसा मागून वर्गणी गोळा केली व पांडवप्रताप, हरिविजय इ. ग्रंथ आणले आणि वाचून घेतले.

कुणाच्या घरी दळण चालले असले म्हणजे महाराज तेथे जात. जात्यात मुठी–मुठीने जोंधळे घालीत व स्वकृत ओव्या म्हणून त्यांना दळू लागत. त्यांच्या या वृत्तीमुळे दिवसेंदिवस ते लोकप्रिय होऊ लागले.

आंधळे असून सुद्धा दिवसा व रात्रीदेखील त्यांना हिंडण्या फिरण्यासाठी कुणाचेहि सहाय्य लागत नसे. डोक्यावर पुस्तकाची पेटी घ्यायची अन् पुस्तके वाचून घेण्यासाठी जवळपास चांदूरबाजार वगैरे गावात ते वेधडकपणे एकटेच जात. चांदूरबाजारला रूपचंदजी होतेच. त्यांच्या सज्जन व सरळ स्वभावामुळे महाराजांना त्यांचा विशेष ओढा वाटे. बरोबर कुणालाहि न घेता रात्री अपरात्री ते त्यांच्या घरी जात. ते लोक निजले असले तर महाराज गंमत करण्याच्या उद्देशाने दाराबाहेर उभे राहून भिकाऱ्याच्या सुरात 'भाकर वाढा ऽ ऽ ऽ' असे ओरडत. मग कुर्याभाई हे रूपचंदांचे चिरंजीव त्यांना दार उघडून घरात घेत व दोघे मिळून रुपचंदजीकडे ज्योतिष–संस्कृत वगैरेचा चर्चा करीत.

त्यांच्या या खेळकर आणि विनोदी वृत्तीने लोकांना ते लगेच आपलेसे करीत. खाण्यापिण्याची बेपर्वा,

विद्येचा हव्यास, विनय आणि सौजन्य या साऱ्या अंगभूत गुणांनी त्यांनी अनेक लोकांकडून मोठमोठाले ग्रंथ वाचून घेतले.

विद्येची आस किंवा ज्ञानाची भूक म्हणतात ती ही अशी असते. महाराजांनी अक्षरशः भुकेल्या बुद्धीने तऱ्हेतऱ्हेचे ज्ञान मिळवले. नुसते मिळवले नाही तर लक्षातही ठेवले आणि नुसतेच लक्षात ठेवले नाही तर ते पुढे वाढवलेही.

विद्यार्जनाबरोबरच इकडे निरनिराळी व्रतवैकल्येपण त्यांनी किशोरावस्थेतच सुरू केली. एकादशी व सोमवार ते नियमाने करीत. शिवरात्रीचा उपवास आणि श्रीकृष्ण जन्माष्टमीचे उपवासही त्यांनी सुरू केले. समाधी लावणे, प्राणायाम करणे वगैरे अलौकिक कृत्यांचा व आचारांचा नीट उलगडा न झाल्याने घरची माणसे त्यांना वेडा ठरवीत.

पण महाराजांनी खेळता खेळता बुक्का म्हणून मातीच खेळगड्यांच्या कपाळाला लावली तरी खरोखरच तिला बुक्क्याचा सुगंध येई. इतकेच काय ते मानसपूजा करीत असतांना बुक्क्याचा सुगंध सगळीकडे दरवळू लागे. त्यामुळे आजूबाजूचे लोक आश्चर्यचकित होत.



ज्ञान मिळविण्यासाठी त्यांना थंडी–वारा, ऊन–पाऊस, दिवस–रात्र कशाचीही पर्वा नसे !

महाराज सकाळी थंड पाण्याने स्नान करून भगवद्-गीता, सप्तशती, तुळशी माहात्म्य वगैरे म्हणत. याच सुमारास ते स्वत: कविता व पदे रचू लागले. ज्ञानेश्वर नामस्मरणाचाही त्यांना छंद लागला.

लोकांना आश्चर्यात टाकणारी आणखी एक घटना घडली. घरातील हेव्यादाव्यामुळे एकदा महाराजांनी ४० तोळे सोमल विष खाल्ले व ते निश्चेष्ट पडले. रात्रभर लोक बिछान्याजवळ जागत बसले. पहाटेच्या सुमारास महाराजांनी तूप प्यावयास मागितले व तूप पिल्यानंतर प्रकृतीस आराम पडू लागला.

एवढ्यामोठ्या अनर्थातून हा मुलगा वाचू शकतो त्याअर्थी तो सामान्य नाही हे त्याचवेळी आजूबाजूच्या लोकांच्या लक्षात आले.

किशोरावस्थेतच त्यांनी मिळवलेले अनेकविध ज्ञान, त्या ज्ञानाचा स्मृतिमधे खोलवर आणि कायमचा असा उठवलेला ठसा आणि योगादिसाधने व समाधी यामधे मिळवलेला अधिकार मधून–मधून प्रसंगानुसार व्यक्त होऊ लागला.

## लग्न व गृहस्थाश्रम

एकदा महाराज सीतारामजी भुयार यांच्या शेजारी

खेळावयास गेले. तेथे सीतारामजीची आई नातीला घेऊन आली होती. ती थट्टेने म्हणाली—'एका बुक्कीत नारळ फोडशील तर ही पोरगी मी तुला देईन.' त्यावर महाराजांनी एकाच बुक्कीत खरोखरच नारळ फोडून दाखवला. मग ते म्हणाले—'आता पिच्छा पुरवून पोरगी घेईन.' पुढे दैवयोग असा की याच मुलीशी योग जुळून महाराजांचा विवाह झाला. याच महाराजांच्या पत्नी सौ. मनकर्णिकाबाई.

लग्न झाले तरी घरगुती कामकाजाकडे महाराज लक्ष देत नव्हते. त्यामुळे पाटिलबुवा त्यांना सारखे टाकून बोलत व कधीकधी त्यांना मारीत सुद्धा. एकदा महाराजांनी देवाची पूजा केल्यावर नैवेद्यासाठी पुरणाची पोळी मागितली. तेव्हा काका संतापले व महाराजांना त्यांनी लाथ मारली. तेव्हापासून महाराजांनी उदासवृत्ति धारण केली. या प्रसंगानंतर ते घरात क्वचितच राहू लागले. बाहेरच कुणाच्यातरी ओटयावर किंवा झाडाखाली ते पडून रहात. दोन अडीच महिने तर ते हिंगणबेटाचा गीर खाऊनच राहिले. पुढे देखील बरेच दिवस त्यांनी कडू निंबाचा पाला खाऊनच भूक शमवली. काही काही वेळेला ते आजूबाजूच्या हितचिंतकाकडे जेवायला

मागत. मिळाले तर खात नाहीतर तसेच बसून रहात.

महाराजांच्या या स्वच्छंदी वर्तनास आळा घालण्यासाठी त्यांचे चुलते खूप खटपट करीत. या सुमारासच माधानच्या शाळेत रामराव म्हणून एक अत्यंत सज्जन व सुशील असे मास्तर आले. काकांनी महाराजांना त्यांच्याकडे नेले व 'या मुलाला काही हिशेव, पाढे, व्याकरण शिकवा' अशी विनंती केली. मास्तरांनी ती मान्य केली. प्रत्यक्ष शिकवू लागले तर हा मुलगा एकपाठी आणि असामान्य बुद्धीचा व अत्यंत चुणचुणीत आहे असे त्यांच्या लक्षात आले. त्यामुळे महाराजांवर त्यांचा विशेष जीव जडला. महाराजहि त्यांच्या घरी वारवार जात येत. हा कुणीतरी अवतारी पुरुष आहे असे मास्तरांना वाटू लागले व महाराजांची ते होता होईल तेवढी सर्व काळजी घेऊ लागले.

पुढे गावात प्लेगची साथ आली आणि त्यात ताई व महाराजांचे वडील गोंदूजी वापू पण वारले. घरात ताईचा महाराजांना फार मोठा आधार होता आणि माया ममता करणारी तीच एक व्यक्ति होती. ताई व वडील वारल्यावर तर महाराजांना घरात सावत्र आईचा फारच जाच होऊ लागला. गृहस्थिति आता अधिकच वाईट झाली. ती सुधारावी अशी महारा-

जांना फार मनापासून इच्छा होती परंतु त्यावेळेला त्यांचे वय अवघे १५--१६ वर्षाचे. घरात ते सर्वात धाकटे शिवाय त्यात वडील चुलत्यांचा त्यांच्यावर राग होताच. त्यामुळे सावत्र आईचा त्रास अधिकच तीव्र झाला.

या सर्व वातावरणाला कंटाळून महाराज पुष्कळदा बाहेर बाहेरच रहात. रामराव मास्तराकडे ते वरचेवर जात येत. मास्तरांची बायको रंगूबाई ही देखील फार प्रेमळ होती. त्या दोघा नवराबायकोंनी विचार केला की नाहीतरी आपणास पुत्र नाहीच, हा मुलगा मोठा अलौकिक बुद्धिमत्तेचा आहे. तर यालाच आपण पुत्र मानू या. या विचाराने मास्तर व त्यांची बायको महाराजांवर विशेष प्रेम करूं लागले. ते जे जे मागतील ते ते त्यांना खायला करून देत. त्यांच्या खाण्यापिण्याची नीट व्यवस्था ठेवीत.

पुढे महाराजांची सावत्र आई त्यांच्यावर विषप्रयोग करण्याच्या खटपटीत लागली. ही बातमी महाराजांच्या कानावर आल्यावर त्यांनी विचार केला की आता या घरात रहाणे काही बरे नाही. त्यांनी लगेच आपली पुस्तकाची पेटी डोक्यावर घेतली आणि लगोलग घर सोडले. वडील चुलत्यांच्या कानावर त्यांनी सर्व




अखंड चालू अस



ीले ग्रंथ लेखन !

गोष्टी घातल्या आणि मग ते रामराव मास्तर यांचे घरी राहू लागले. मात्र त्यांच्या पत्नी सौ. मनकर्णिकाबाई या घरातच होत्या. त्यांना शिकवण्याची सोय महाराजांनी केली होती.

परंतु महाराजांचे वडील चुलते या सर्व प्रकाराने अधिकच चवताळले. महाराजांना उद्देशून ते अनेकप्रकारे अपशब्द बोलू लागले. 'हा चावडीवर येत नाही. . .कामकाज पहात नाही. . .नुसता गावभर हिंडत रहातो. अशानं याला अन्न कुठलं मिळणार ? . . हा अन्न अन्न करून मरील. . .' अशा तक्रारी ते सदा करीत. एकदा तर म्हणाले, की 'याला घराची फिकीर नाही तर मला तरी कसली जरुरी आहे ? . . आत्ताच मी घरदार, शेतीवाडी, सगळं ब्राह्मणाला दान करून टाकतो !'

चुलत्याची ही धमकी ऐकून महाराज सरळ म्हणाले– 'आत्ता आणतो मी ब्राह्मणाला बोलावून ! खरंच करून टाका, वरं दान–सगळं घरदार !'

महाराजांनी असं म्हटल्यावर चुलते गप्प झाले.

पण पुढे ते सगळा राग मनकर्णिकाबाईवर काढू लागले. सतत ते त्यांना टोमणे मारीत 'तो संत झाला तर तू

संतीण हो. तो भीक मागेल तर तू झोळी धर. ' असे त्यांनी वारंवार म्हणावे परंतु विचाऱ्या मनकर्णिकाबाई सगळी बोलणी निमूटपणे सहन करीत. काहीएक बोलत नसत. पुढे पुढे तर चुलत्यांचा राग वाढतच गेला आणि एक दिवस त्यांनी मनकर्णिकाबाईनाही घरातून हाकलून दिले

त्याहि येऊन रामचंद्र बापूंच्या घरी राहू लागल्या चुलते फक्त नेमाने दोन पायल्या ज्वारी तेवढी देत. बाकी तेलमीठ काहीएक देत नसत. मनकर्णिकाबाई इकडून तिकडून मागून आणून कसाबसा स्वयंपाक करीत व महाराजांना जेऊ घालीत. या वेळेला त्यांची परिस्थिति मोठी बिकट होती. डोक्याला धड तेल नाही. न्हायला माखायला नाही. अंगावर धड लुगडे नाही की धड पोटभर खायला नाही. परंतु जसा तावून सुलाखून घेतल्याखेरीज सोन्याचा कस उतरत नाही– सोनं शुद्ध रूपात बाहेर पडत नाही–तसं परिस्थितीच्या भट्टीत, आगीत होरपळल्याशिवाय माणसाचे गुणही चमकून उठत नाहीत. हिरा तेजस्वी होण्यासाठी त्याला छन्नीचे आघात सहन करावेच लागतात ना ? . . . ते आघात सहन केल्यावरच त्याचे पैल लखलखू लाग-

तात. मगच त्याच्या तेजाने जगाचे डोळे दिपतात. महाराज आणि सौ. मनकर्णिकाबाई यांनी पण परि-स्थितीच्या या यातना शांतपणे सहन केल्या. त्याही काळात दोघे ईश्वर सेवेत आणि भक्तीत मग्न असत.

पुढे १९०५ मधे कार्तिक शुद्ध पंचमीस दुपारी बारा वाजता सौ. मनकर्णिकाबाईंना पुत्र झाला. मुलाचे जन्म नाव भास्कर आणि व्यावहारिक नाव अनंता असे ठेवले. मुलगा झाल्यानंतर मुलाच्या ठिकाणी आईला मोह निर्माण झाला तर ती गोष्ट ईश्वर सेवेच्या मार्गात अडथळा आणणारी आहे असे महाराजांना वाटे. त्यांनी ठरविले की मनकर्णिकाबाईचे मन मुलात अधिक अडकता कामा नये.

वास्तविक त्यावेळी अनंता लहान म्हणजे अवघा चारएक महिन्याचा होता. शिवाय एकुलता एक मुलगा. त्यामुळे त्यात आईचा जीव अधिक गुंतलेला. पण ईश्वरसेवेच्या दृष्टीने हे योग्य नाही असे ठरवून महाराजांनी एक खोटा कट रचला. एक दिवस ते रात्री उठले व बायकोस म्हणाले ' ऊठ याला विष दे ' स्वतःच्या हाताने मुलाला विष देतांना त्या माऊलीचे मन प्रथम फार कष्टी झाले. पण मनकर्णिकाबाई

देखील काही कच्च्या गुरूच्या चेला नव्हत्याच. महाराजांवर त्यांची अढळ श्रद्धा. ते सांगतील ते प्रमाण. पुत्रमोह दूर करून मुलाला जेव्हां त्या खरंच विष देण्यास सज्ज झाल्या तेव्हां महाराजांचे समाधान झाले व त्यांनी खरा प्रकार त्यांना सांगितला.

त्या जाणिवपूर्वक सर्व मोहापासून दूर राहून ईश्वर-भक्तीत तल्लीन रहात असत. पतीची सेवा आणि ईश्वरभक्ती यातच त्यांनी आपले आयुष्य खर्च केले. पुढे पुढे त्यांची प्रकृति अशक्त होत गेली.त्यांना वरचे-वर पित्त होत असे व उलटी होत असे. एकदा यावली येथे जन्माष्टमीचा उत्सव साजरा करायला सर्व मंडळी निघाली. जातांना महाराज नाना कविमंडन यांना म्हणाले 'चांगले औषध बरोबर घे. आपल्या मंडळीत एकजण खूप आजारी पडणार आहे!' महाराजांना जणू पुढे पुढे सरकत असलेल्या मृत्यूची चाहूल लागली होती. सर्वजण यावली येथे गेले आणि मनकर्णिकाबाईंना एकाएकी भयंकर उलटी झाली व त्या मूर्च्छित पडल्या. पुढे लवकरच त्यांचा देहांत झाला. सर्व लोक शोक करूं लागले. आपल्या प्रिय पत्नीच्या मृत्यूने महाराजांचे मन देखील सैरभैर

झाले नाही असे कसे म्हणावे ? पण संयम हीच थोर-पुरुषांची खरी शक्ति. त्याही प्रसंगी महाराजांनी संयम दाखवला. मन आवरले आणि हाती टाळ धरून तास-भर प्रेमळ गीतांनी भगवंताला आळविले.

मनकर्णिकाबाईचा मृत्यू इ. स. १९०७ मध्ये झाला. त्यावेळी अनंता अवघा दोनएक वर्षाचा. तर महाराज देखील ऐन तारुण्याच्या उंबरठ्यावर म्हणजे पचवीस-एक वर्षांचे. मनकर्णिकाबाईंना काळाने संसारातून अक्षरश: उचलून नेले. निष्ठुरपणे ओढून नेले. पण एवढ्या अल्प आयुष्यात देखील त्यांनी ईश्वरभक्तीत आपली चित्तवृत्ति सतत आनंदी आणि निर्विकार अशी ठेवली. त्या आदर्श पत्नी तर होत्याच पण आदर्श शिष्याहि होत्या. महाराजांची शिकवण त्यांनी आपल्या विचारात बाणवली आणि आचारातहि उतरवली. त्यांची रहाणी अगदी साधी असे. सासरी जाच, निंदा, टोमणे आणि अत्यंत प्रतिकूल परिस्थिति असूनहि त्या आनंदी व समाधानी असत. पुढे पुढे महाराजांना पोट-भर खायला घालण्यासाठी प्रसंगी त्यांना अर्धपोटी देखील रहावे लागे. परंतु सर्व प्रकारचे कष्ट त्यांनी न कुरकुरता सहन केले. नंतर महाराजांना चांगले दिवस

आले. पण या सुखाच्या दिवसातहि त्यांनी कपडेलत्ते किंवा दागदागिने यांचा हव्यास धरला नाही. साधी रहाणी उच्च विचारसरणी हे त्यांच्या जीवनाचे जणू सूत्र होते.

महाराजांची सेवा करणे, त्यांना जेऊ घालणे, त्यांच्याबरोबर सुंदर मंजुळ आवाजात देवाची पदे म्हणणे ही त्यांची आवडती कामे होती.

महाराजांबरोबर असणाऱ्या भक्तांची देखील त्या आईप्रमाणे प्रेमाने काळजी घेत त्यांच्यासाठी दगदग सोसण्यास त्यांना आनंदच वाटे. प्रेमळ असल्या तरी कुणी चुकले तर त्याला ताळ्यावर आणण्याचा वचक देखील त्यांच्या ठिकाणी होता. त्यामुळे लोक त्यांना फार मान देत. त्यांच्या या गुणामुळेच महाराजांना त्या विशेष प्रिय होत्या. त्यांच्या मृत्यूनंतर महाराजांनी 'पत्नीप्रेम पराग' नावाचे भावकाव्य रचले. ते रसिकांना हेलावून सोडणारे आहे. संतसाहित्यात संतकवीच्या मुखातून निघालेले पत्नीविषयीचे हे एकुलते एक विरहगीत आहे. त्या मधुर काव्याचा शेवट असा आहे—

विलासललिते हृद्‌वनी सकंटकहि
परि गुलाब फुल पाळी ।

सौरभ मिळेल तुजचि,
जीवन सुकवूनि, न पाकळ्या गाळी ।।

या आघातानंतर मात्र महाराजांची तब्येत दिवसें-दिवस खालावतच गेली. १९०८ साली स्वत: त्यांनी शिवदीक्षा घेतली. यानंतरचा त्यांचा सर्व काळ भजन पूजन, प्रवचन व ग्रंथरचना यातच जात असे.

**कात्यायनीव्रत**

संसारात पडले तरी महाराजांचा खरा संसार होता ईश्वरावरोबरच ! ते स्वत:ला ज्ञानेश्वर महा-राजांची कन्या मानीत. शरीर पुरुषाचे असले तरी मी एक स्त्रीच आहे–एक गोपिका आहे–; मी ईश्वराची म्हणजे कृष्णाची पत्नी आहे अशाच भावनेत ते निमग्न असत. त्यामुळे एखादेवेळी ते स्त्रीवेशही धारण करीत असत.

स्वत: ज्ञानेश्वरकन्या असल्यामुळे कृष्णपत्नीच्या पदाचा अधिकार मिळवण्यासाठी त्यांनी ‘ कात्यायनी ’ या महाव्रताचा आरंभ केला.

वयाच्या बाविसाव्या वर्षी इ. स. १९०२ साली त्यांनी शुक्लेश्वर वाठोडा येथे कात्यायनीदेवीच्या

मंत्राची दीक्षा घेतली. हे व्रत भागवतातील दशमस्कंधात सांगितलेले आहे. हे व्रत फार प्राचीन आहे. हे व्रत करून श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचा अधिकार गोपींनी मिळवला असे भागवतात म्हटले आहे.

नदीच्या काठावर वाळूचा महादेव करून ३३ दिवसांचे व्रत प्रथम महाराजांनी केले. ते म्हणतात–

" प्रेमाचा करू कळस । हरीस अर्पू ब्रह्मरस ।
श्रीकृष्णपदी सावकाश । भृंगी होऊं चला । "

विरहिणीच्या विरह–प्रेमातील विषयभाव वेगळा करून ते प्रेम भगवंताला अर्पण केले की त्याला माधुर्यभक्ती म्हणतात. महाराजांनी–पुरुषांनी दास्यभक्तीपासून व स्त्रियांनी वात्सल्य भक्ति पासून सुरुवात करावी–असेच सर्वत्र सांगितले. आणि आत्मज्ञान झाल्याशिवाय माधुर्यभक्तीचा अधिकार येत नाही हे स्पष्ट केले. यातून निर्माण होणारे गोपी–कृष्ण प्रेमाचे अद्वैत मधुर होय. या अद्वैताला 'मधुराद्वैत' व महाराजांना 'मधुराद्वैताचार्य' असे म्हणतात.

या कात्यायनी व्रताच्या प्रसंगी सप्तशतीचे पठण, ज्ञानेश्वरीचे पारायण, भागवत निरूपण, भजन, पूजन, होमहवन वगैरे भरगच्च कार्यक्रम होत असत.

## जन्माष्टमी उत्सव

कात्यायनी व्रताच्या जोडीला महाराजांनी सुरू केलेला दुसरा उत्सव म्हणजे श्रीकृष्ण जन्माष्टमीचा. श्रीकृष्ण हे मुळी महाराजांचे प्रमुख उपास्य दैवत. श्रीकृष्ण म्हणजे त्यांचे सर्वस्व.

त्यामुळे जन्माष्टमीचा उत्सव मोठ्या कौतुकाने साजरा केला जाई. उत्सवानंतर द्वादशीला काला होई. काल्याच्या वेळी महाराज नवीन ओव्या रचीत व म्हणत असत. महाराजांचा आवाज फारच गोड होता. ते गाऊ लागले की आजूबाजूचे लोक तल्लीनतेने ऐकत राहत.

## विद्याव्यासंग

भक्तिबरोबरच महाराजांचे ज्ञानदानही दिवसें-दिवस वाढतच होते. केवळ हिंदुधर्मग्रंथांचाच नाही तर बायबल–कुराणाचाहि त्यांनी अभ्यास केला होता. मुसलमान धर्म मुळातून समजून घेतला होता. चावडी-वर जाऊन कुणी एखादा मुसलमान गाठून त्यांनी

कुराण वाचवून घेतले व ते लहानपणीच तोंडपाठ केले. वयाच्या केवळ १३ व्या वर्षी त्यांनी बायबल पाद्री लोकांकडून विकत घेऊन वाचवून घेतले. यावरून सर्व धर्मांच्या ठिकाणी समान आदर ठेवण्याची त्यांची प्रवृत्ती तर दिसून येतेच पण शिवाय सर्व धर्मांच्या ग्रंथात काय काय सांगितले आहे हे जाणून घेण्याची प्रबळ इच्छा पण दिसून येते.

उपनिषदे खरं तर अत्यंत गहन विषयांनी भरलेली. पण त्या ग्रंथातहि त्यांची तीव्र बुद्धी सहजपणे संचार करी. सर्व वेदांचे व सर्व पुराणांचे त्यांनी अध्ययन केले होते व या सर्व ग्रंथामधली उदाहरणे अन् अवतरणे ते खडान्‌खडा सांगत असत.

खेडवळ व अडाणी लोकांना सुधारण्याचाहि महाराजांचा प्रयत्न चाले. या सामान्य लोकांना वेदांताची कल्पना करून देण्यासाठी महाराजांनी तुंबडीची गीते लिहिलीत.

वेदांतविषयापासून ते वायकांच्या पुषादितवाराच्या कहाण्यांपर्यन्त आणि साम गायनापासून ते शाहीरांच्या डफगाण्यापर्यंत सर्व गोष्टीत महाराज रस घेत व तुंबडीसारखी लोकगीतांची रचना करून

सामान्यांना योग्य मार्गाचा उपदेश करीत.

शंकराचार्यांनी जे अद्वैत तत्त्वज्ञान सांगितले होते त्याला महाराजांनी सगुणभक्तीची जोड दिली. संताप्रमाणे भक्तीपर अशी रसाळ अभंगरचना त्यांनी केली.

कपिल मुनींनी किंवा व्यास मुनींनी जशी सूत्रे रचली तशी महाराजांनी सूत्रेही रचली, सूत्रांवर भाष्येही लिहिली. त्याशिवाय संगीत, वैद्यक, व्याकरण, साहित्यशास्त्र, इत्यादि अनेक विषयांवर त्यांनी फार वरच्या दर्जाचे असे लेखन केले. आपल्या जुन्या ग्रंथात सांख्य--योग इ. सहा दर्शने सांगितली आहेत. त्या दर्शनात परस्पर विरोध जाणवतो. परंतु महाराजांनी हा वरवर भासणारा विरोध नाहीसा करून त्या सहाहि दर्शनांचा समन्वय केला. हे सर्व करीत असतांना वेळोवेळी त्यांनी परमार्थ मार्गातील भोंदूगिरी उघडी करून दाखवली. जे स्वतःला धर्मसुधारक म्हणतात पण धर्माच्या अंतरंगात उगाचच ढवळाढवळ करतात अशा लोकांचाहि त्यांनी चांगला खरपूस समाचार घेतला. आपली भारतीय संस्कृति प्राचीन काळी भौतिक शास्त्रातहि कशी पुढे गेली होती हे इतिहा-

सातील प्रमाणे दाखवून त्यांनी लोकांना पटवून दिले. प्राचीन ग्रंथांची योग्यता सामान्य लोकांच्या नजरेत भरवण्याचे कार्य महाराजांनी फार उत्कटपणे व उत्कृष्टपणे केले. त्यांच्या वाङ्मयात प्राचीन व आधुनिक विषयांची इतकी रेलचेल आहे की साहित्य सम्राट न. चिं. केळकरांनी म्हटल्याप्रमाणे 'महाराजांचे ग्रंथ म्हणजे एक मोठा सांस्कृतिक ज्ञानकोशच झाला आहे.'

महाराजांनी लिहिलेल्या पुस्तकाची व रचलेल्या ग्रंथांची पुढील यादी पाहून या ज्ञानकोशाबद्दल कुणालाहि आश्चर्य वाटल्याशिवाय राहणार नाही.

त्यांच्या ग्रंथरचनेची संख्या सर्व मिळून १३० पर्यंत जाते. त्यात– सूत्रग्रंथ ९, भाष्यग्रंथ २५, शास्त्रग्रंथ ११, आकरग्रंथ १, भक्तिग्रंथ १०, योग ८, सांख्य ४, आयुर्वेद ३, प्रकरण ग्रंथ ९, गाथा २, निबंध १०, संवाद ग्रंथ ८, पत्रव्यवहार ११८, लोकगीते ४, स्तोत्रे ३, चरित्र-आख्याने ३०, विविध रचना ७ असून काव्यशास्त्र, व्याकरण, नाटक, क्रीडा, संगीत, लघुलिपी, नवीन भाषा, धर्म समन्वय, डार्विनमत खंडन, आर्यांचा खरा इतिहास असे विषय त्यात आहेत. त्यात अभंग २५००,

पदे २५००, गीते १२५०, श्लोकादि रचना १०००, ओव्या २३००० आहेत.

हे सर्व ग्रंथ साधारणपणे एकूण २५ खंडात विभागले आहेत. प्रत्येक खंडाला महाराजांनी यष्टी (आंधळ्याची काठी) असे नाव दिलेले आहे.

अशाप्रकारे स्वतःला दिसत नसले तरी दिसणाऱ्यांना खरे ज्ञान व्हावे म्हणून या बालांधाने जी अनेक पुस्तके व ग्रंथ रचले त्यांची यादी पहाता मन आश्चर्याने क्षणभर स्तंभितच होते !

आणि दुसरी महत्वाची गोष्ट म्हणजे हे सर्व वाङ्मय त्यांनी ऐन तारुण्यात वयाच्या ३४ व्या वर्षी लिहून संपवले आहे हे विशेष !

इतक्या लहान वयात, दृष्टी नसतांनाहि त्यांना हे साधलेच कसे ? . . .स्वतःला लिहिणे कठिण असल्यामुळे मास्तर, रामचंद्रबापू यांना लेखक करून महाराजांनी ग्रंथ लेखनास सुरूवात केली. नंतर पुढील काळात हरिभाऊ केवले, गणपतराव मुळे व श्री बाबाजी महाराज पंडित यांनी त्यांचे वाङ्मय लिहून घेतले. त्यांची सर्वच विषयात मति चाले. शिवाय

स्मृति अगदी तीव्र. एकदा वाचलेले त्यांच्या बुद्धीत कोरले जाई. डोळे नसल्याने पुस्तकेहि वाचवूनच घ्यावी लागत. ती वाचून घेण्यास महाराज कधीकधी सिरसगावच्या सरकारी शाळेत जात. तेथील शिक्षकाबरोबर गीता व वेदांत याबद्दल वादविवाद करीत आणि वादात अनेक ग्रंथातली इतकी उदाहरणे आणि अवतरणे देत की प्रतिपक्ष गप्पगारच होई !

तुकारामाचा अभंग किंवा ज्ञानेश्वरीतील ओवी अगर गीतेतला एक श्लोक यापैकी काहीतरी कुणी एकाने वाचताच महाराज त्यावर स्वरचित ओव्या म्हणत. महाराजांची भाषा सोपी आणि ओघवती होती. महाराजांच्या ओव्यामधून कित्येकदा भजनाची सुरूवात होई अन् भजन तासन्तास चाले. भजनाच्या प्रसंगी श्रोत्यांच्या नेत्रातून प्रेमाश्रूच्या धारा वाहू लागत.

महाराजांचा आवाज जात्याच गोड होता. त्यात पुढील काळात त्यांनी स्वतः संगीत शिकायला सुरूवात केली होती. रोज दोन तास ते संगीताची आराधना करीत. संगीत शास्त्रातले फार मोठे अधिकारी भातखंडेबुवा यांच्याशी देखील महाराजांनी पत्ररूपाने संगीतावर चर्चा व वादविवाद केला. ' त्यांच्या हिंदु-

स्तानी संगीत पद्धति ' या ग्रंथातले दोषहि महाराजांनी दाखवून दिले. व ' गानसोपान ' हा संगीतावरील महत्वाचा ग्रंथ लिहिला.

पुष्कळदा महाराज जवळ एकतारी वाळगीत व एकतारी वाजवीत ज्ञानेश्वर माऊलीचे नामस्मरण करीत ' धावरे व्रजराया । किती अंत पाहसी ' इ. पदे नवीन रचून ते स्वत: त्यांचे गायन करीत.

कीर्तनाला आवश्यक असे गायनाचे अंगहि महाराजांना पूर्णत: अवगत होते. तबल्याची त्यांना उत्तम माहिती होती. नाटयकलेविषयी त्यातल्या जाणत्यांशी ते चर्चाहि करीत. संस्कृतचा त्यांचा व्यासंग फार मोठा होता. ते संस्कृतात उत्तम प्रकारे कीर्तन करीत. पद्येहि रचीत. त्यांचे ३० ग्रथ संस्कृतात आहेत.

जमणाऱ्या भक्तगणाला ते वेद, वेदांत, योग, व्याकरण, वैद्यकी, अमृतानुभव, ज्ञानेश्वरी इत्यादि वर वारंवार प्रवचने देत असत. काव्यशास्त्र या विषयीहि महाराजांचा अभ्यास फार मोठा होता. तसेच वैद्यक शास्त्राबद्दलहि ते अधिकार वाणीने जाणत्यांशी चर्चा करीत.

**महाराजांचे कार्य**

त्यांचा आश्चर्यचकित करणारा खरा व सर्वात

मोठा चमत्कार म्हणजे त्यांचे गंथ लेखन. इतक्या विविध प्रकारचे विषय त्यांनी हाताळले आहेत की सरस्वती जणू त्यांचे घरी पाणी भरीत होती ! शारदा जणू त्यांच्या जिभेवर नाचत होती. त्यांचे हे साहित्यिक कार्य फार मोलाचे आहे. फक्त ३४ वर्षांच्या वयात त्यांनी १३० ग्रंथ लिहिले. आपल्या प्राचीन वाङ्मयात दडलेले विविध प्रकारचे विचारधन शोधून काढून त्यांनी ते लोकांपुढे मांडले.

दुसरे महत्वाचे कार्य म्हणजे ज्ञानाच्या विविध शाखांमधे दिसणारा विरोध नष्ट करून त्यांची एकवाक्यता करणे, त्यांचा समन्वय करणे. भारतीयांमधे असलेल्या अंतर्गत दुहीला मूठमाती मिळेल अशी समन्वय दृष्टी त्यांनी दिली.

हे समन्वयाचे काम त्यांनी केवळ शास्त्राच्याच पुरते मर्यादित ठेवले नाही. त्यांचे सगळ्यात मुख्य काम म्हणजे हिंदुधर्माबरोबरच मुसलमान व ख्रिश्चन वगैरे पंथांचा त्यांनी केलेला अभ्यास आणि सर्व धर्मांचा समन्वय घालण्याचा त्यांनी केलेला यशस्वी प्रयत्न आजच्या विसाव्या शतकात त्यांचे हे कार्य अनेकांना स्फूर्ती देणारे ठरेल—अनेकांना त्यापासून

प्रेरणा मिळू शकेल! दुसऱ्याचा धर्म कधीही गौण मानू नये; तुच्छ लेखू नये;—असे त्यांना वाटे. सगळी धर्म-मते व सगळेच पंथ चांगले आहेत. सर्वांविषयी सम-बुद्धि ठेवणे ज्याला साधले तोच खरा आचार्य वा सद्‌गुरु होण्यास पात्र आहे असे ते म्हणत. सर्व धर्म अधिकारानुसार ईश्वरानेच निर्माण केले आहेत. त्यामुळे सर्व धर्मांबद्दल आदर वाळगावा असे त्यांचे मत होते व ते त्यांनी आचरणातहि आणले होते.

महाराजांनी शंकराचार्यांच्या अद्वैत तत्त्वाच्या आधारावर संतांच्या भक्तिशास्त्राची मांडणी केली. हृदयात निर्गुणाचा अनुभव आणि बाहेर सगुण अव-ताराची भक्ती सांगून मधुराद्वैत दर्शनाची निर्मिती केली. अन् "अवताराचे सगुण रूप कधीही नाश पाव-णारे नाही" या अर्थानं अनध्यस्त विवर्त या शब्दाची नवीन योजना करून तत्त्वज्ञान क्षेत्रात फार मोलाचे योगदान केले.

इतिहासाच्या क्षेत्रात आर्य बाहेरून भारतात आले या पाश्चात्य मताचे पूर्णपणे खंडन केले. आर्य हा वंश नाही*— शूद्र वर्ण हा आर्यांचाच एक भाग आहे, असे सिद्धान्त समर्थपणे मांडले. ३००० वर्षांपूर्वी सर्व

जगात एकच आर्य संस्कृती नांदत होती याचे इतिहासप्रमाण्य दाखले देऊन स्पष्ट केले. आणि आर्य–अनार्य, उत्तर–दक्षिण, ब्राह्मण–ब्राह्मणेतर वगैरे दुहीमूलक अपसिद्धान्तावर कडाडून हल्ला चढविला.*

ज्ञानभक्तीच्या क्षेत्रातील या महापुरुषाने प्राचीन–अर्वाचीन सर्व सांस्कृतिक विषयांवर मूलभूत लेखन केले–योगदान दिले–अन् आधुनिक पाश्चात्य विचारांना आव्हान दिले आणि प्राचीन आर्य संस्कृतीचे परंपरासूत्र कायम ठेवले. या संबंधीची त्यांची भूमिका अतिशय महत्वाची आहे–

"आर्यांचे म्हणणे बरोबर आहे हे सिद्ध करण्याशिवाय मला व माझ्या हितचिंतकांना जीवनात दुसरे कोणतेही महत्वाचे कर्तव्य नाही"

अलौकिक बुद्धिमत्ता, त्याच्याच जोडीला अचाट अशी स्मरणशक्ति, युक्तिवाद करण्याचे सामर्थ्य आणि अंध असूनहि सर्व शास्त्रात मिळवलेले पांडित्य हे गुण

---

***टीप–** डॉ. आंबेडकरांनी देखील "शूद्र पूर्वी कोण होते ?" या ग्रंथांत महाराजांनी मांडलेले आर्य विषयक मूळ सिद्धान्तच वैदिक–पौराणिक–ऐतिहासिक आधार देऊन अधिक स्पष्ट केलेला आढळतो. हे उल्लेखनीय आहे. पान ६६, ६७, ७२, ७४, ७५, ८०.

महाराजांच्या अंगी असल्यामुळे थोरामोठ्यांच्या शंकाकुशंकांनाही महाराजांनी यशस्वीपणे उत्तरे दिली व त्यांचे समाधान केले. प्रवचनाच्यावेळी निरनिराळ्या ग्रंथातली वाक्येच्या वाक्ये ते म्हणून दाखवत. इतकेच नव्हे तर पान व ओळहि खडान्खडा सांगत. स्वत: डोळ्यांनी ते पुस्तक वाचलेले नसतांनाहि केवळ स्मृतीच्या आधारे हे सर्व सांगणे खरे तर किती कठिण आहे! नुसते कठिणच नव्हे तर अशक्य वाटावे असेच विलक्षण आहे. परंतु महाराजांनी ते सारे शक्य करून दाखवले.

मराठी भाषेबरोबरच त्यांना संस्कृत व इंग्रजी भाषाहि येत असत. संस्कृत भाषेवरील त्यांचे प्रभुत्व पाहून मोठमोठे विद्वान थक्क होत. महाराजांसारखे सखोल ज्ञान, मार्मिक वादकौशल्य आणि निरुत्तर करणारे युक्तिवाद इतरत्र क्वचितच कुठे वाचावयास मिळतील.

अंध असूनहि महाराज सतत हिंडत फिरत. वऱ्हाडातच नव्हे तर आळंदी, पुणे, मुंबई, वृंदावन, काशी, जगन्नाथपुरी, कलकत्ता इ. ठिकाणी ते हिंडून आले.

## शेवट

पुढे पुढे महाराजांची प्रकृति नीट रहात नसे. एक वर्षापासून त्यांना मलेरियाचा ताप येत होता. पुढे पुढे तो फारच वाढला. त्यात त्यांच्या पत्नी सौ. मनकर्णिकावाई यांचे निधन झाल्यापासून तर महाराजांनी स्वतःच्या प्रकृतिकडे दुर्लक्षच केले होते त्यामुळे त्यांची अशक्तता वाढत गेली.

महाराज तसे मुळात देखणे. रंग घनसावळा, उंची सहा फूट, तेजःपुंज शरीर, आजानुवाहू म्हणजे गुढग्यापर्यन्त हात. असे लांव हात हे भाग्याचे आणि अलौकिक जीवनाचे लक्षण होय. असे हात क्वचितच कुणाच्या वाट्याला येतात. महाराजांनी केस वाढवले होते. ते कधी कधी गोपी वनून स्त्रीवेश धारण करीत. एकदा ते शिवाची पार्थिव पूजा करीत असतांना शिवलिंग भंगले. त्यावेळी महाराज म्हणाले– "आजपासून मला जाण्याचे वेध लागले"

अशाप्रकारे महाराजांना मृत्यूची चाहूल आधीच लागली. तरीहि त्यांची दिनचर्या नेहमीप्रमाणे आनंदानेच पार पडत होती. आता आपला काळ संपत आला हे त्यांनी ओळखले. ज्ञानेश्वर महाराजांना ते माऊली

म्हणत व स्वत:ला त्यांची कन्या समजत. त्यामुळे अखेरचा काळ ज्ञानेश्वर माऊलीच्या जवळपास घालवावा असे त्यांनी ठरवले व पुण्यास येऊन महर्षी अण्णासाहेब पटवर्धन यांचे औषध सुरू केले.

परंतु प्रकृति दिवसेंदिवस खालावतच चालली तेव्हा महाराजांनी स्वत:चे प्रतिनिधी नेमून आपल्या सांप्रदायाची जबाबदारी श्री. पंडित यांचेवर सोपवली व इ. स. १९१५ मधे २० सप्टेंबरला आपला देह ठेवला. त्या दिवशी भाद्रपद शुद्ध द्वादशी होती. अगदी सकाळी सूर्योदयाच्या मंगल प्रसंगी हा अज्ञानाचा अंधार नष्ट करणारा ज्ञान–सूर्य मावळला. अन् सर्व भक्तगण शोकाच्या अंधारात बुडून गेले!

ज्यांच्यावर महाराजांनी सांप्रदायाची जबाबदारी सोपवली होती ते श्री. पंडित हेच पुढे श्री. बाबाजी महाराज म्हणून प्रसिद्धीला आले व त्यांनी मधुराद्वैत सांप्रदायाची धुरा सांभाळली व त्यांचे सर्व अप्रकाशित वाङ्मय प्रकाशित केले.

महात्मे हे जन्ममरणाच्या रूढ चाकोरीपासून दूरच असतात. गुलाबराव महाराजांनी जे कार्य केले आहे, जी ग्रंथ संपदा निर्माण केली आहे, जे विचार समा-

जाला शिकवले आहेत, जे प्राचीन आर्य परंपरेचे सूत्र आपल्यापर्यंत आणून पोचविले आहे–त्या साऱ्यांच्या रूपाने ते आजही आपल्यात विद्यमान आहेतच.

त्यांच्या अंगचे अनेक दैवी गुण आपण पाहिले. त्यांची विद्येची लालसा, पुस्तकांचे प्रेम, ज्ञानासाठी त्यांनी सोसलेल्या हालअपेष्टा आपण पाहिल्या. ज्ञानापेक्षा मोठी अशी गोष्ट या जगात नाहीच. ज्ञान मिळवण्यामागची त्यांची तळमळ व त्यात भर घालण्यासाठी त्यांनी केलेले प्रयत्न हे सारे सारे आपल्याला आजहि खूप काही शिकवून जातात. त्यांच्या गुणांचा आदर्श पुढे ठेऊन त्यातले आपण थोडे जरी आपल्या अंगी बाणवण्याचा प्रयत्न केला तर आपल्याही आयुष्याचे सोने होईल !

संत चरित्रे ही परिसासारखीच असतात. त्यांच्या स्पर्शाने–वाचनाने–मननाने आपल्या जीवनाचे सुवर्ण व्हायला काय वेळ लागणार? सुगंधी फूल वेलीवर फुलते; काही काळाने नाहीसे होते. पण त्याच्या सहवासाने वारा सुगंधित बनतो. वाराच काय खालची मातीदेखील सुगंधित होते. "पुष्पसंगें मातीस वास

लागे", असे म्हटलेले आहे ना ? मोठ्यांच्या विकसित जीवनातून सुगंध घेऊन आपणहि आपले जीवन सुगंधित करावयाचे असते. गुलाबराव महाराजासारखे संत–महात्मे या जगात जन्म घेतात ते इतरांना उन्नतीचा मार्ग दाखवण्यासाठीच!

जगाच्या कल्याणा । संतांच्या विभूति ।।
देह कष्टविती । उपकारे ।।

।। शुभंभवतु ।।

आग्रा.
९३९८ दि. ६।१।८२
विषय

BVBK-0401317